म.सं.कौ.हिं.का.अर्ज क्र.  ११४/२०२२                                         निशाणी क्र. ३१/क

<u>अर्जदारतर्फे साक्षीदार क्र. १ चा उलटतपास शपथेवर सुरू</u>

<u>उलटतपास वि.प.तर्फे विधीज्ञ श्री. रूईकर वकिल.</u>

११.         हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये लग्नपत्रीका व आधारकार्ड या व्यतिरीक्त कोणताच मुळ कागदाची नोंद मी सरतपासामध्ये केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी मागील तारखेला उलटतपासामध्ये बांधकामासाठी ८ लाख रूपये माझेकडे कोठून आले व बांधकाम साहित्याची बिले व बॅकेचे खाते असे सांगीतले होते ते मी आज पर्यंत हजर केले नाहीत. साक्षीदार सांगते की, रत्नाकर बॅकेचा खातेउतारा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्याकडे ८ लाख रूपये कोठून आले व बांधकाम साहित्याची बिले नसल्यामुळे मी ती आज अखेर हजर केली नाहीत. मला माझ्याकडील ८ लाख रूपये कोठून आले व बांधकाम साहित्यांची बीले हजर करायला मला काही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, ते माझ्या विरोधात जातील म्हणून मी दाखल केली नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या शपथपत्रामध्ये माझ्या घराचे बांधकाम कधी सुरू झाले व कधी संपले हे नमुद नाही. मी माझ्या घराचे फोटो पाहिल्यास ओळखू शकते. आता मला दाखविण्यात आलेले फोटो हे माझ्या घराचे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या बंगल्यामध्ये दुकान आहे. माझ्या अर्जामध्ये मी पतीच्या घरातून बाहेर पडले व आईकडे राहण्यास गेले हा मजकूर चुकीचा लिहलेला आहे. नवीन बंगल्यामध्ये मी सन २०२१ पासून राहण्यास गेले. मला नि.क्र. सोबतचे दोन फोटो दाखविले ते माझ्या बंगल्याचे आहेत हे खरे आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी नवीन बंगल्यामध्ये दि.२४/०५/२१ नंतर राहण्यास गेले. हे म्हणणे खरे नाही की, बंगल्यात राहायला जाण्याआगोदर मी वेगळे राहण्याचा विचार करीत होते. हे म्हणणे खरे आहे की, वि.प.च्या जाचाला कंटाळून मी वेगळे राहण्याचा विचार करीत होते असे माझ्या शपथपत्रामध्ये नमुद आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वि.प.पासून वेगळे राहण्याची तयारी सुरू ठेवली होती. हे म्हणणे खरे आहे की, घराचे बांधकामाला खर्च कोठून केले याची नोंद माझेकडे नाही व ती मी हजर केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी आयकर भरत नाही. माझ्या दुकानाचा जी.एस.टी.नंबर नाही. मला कल्पना नाही की, जी.एस.टी.नंबर न काढता दुकान चालविणे हा गुन्हा आहे. मी जी.एस.टी.नंबर काढण्याचा

कधी विचार केला नाही.

१२. बापू ऐवळे याची मिळकतीचा मी घेण्यापूर्वी त्याचा गहाणदस्त झाला होता. तो गहाणदस्त कोणाच्या नावाने झाला होता हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीने ७५ हजार रूपये दिले होते व तो गहाणदस्त माझ्या पतीच्या नावाने बापू ऐवळे यांनी केला होता. हे म्हणणे खरे आहे की, गहाण दस्त झाल्यापासून ती मिळकत माझ्या पतीच्या ताब्यात होती. हे मला माहिती नाही की, त्या मिळकतीचा दि.२८/०५/०७, दि. २५/०५/१२ रोजी असे दोन गहाणदस्त माझ्या पतीच्या नावाने झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या मिळकती माझ्या पतीच्या ताब्यत आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्याच मिळकतीचे खरेदीपत्र माझ्या पतीने माझे नावे दिले. मी खरेदी घेताना गहाण दस्त रद्द करून घेतलेले नाहीत. मला गहाण दस्त रद्द करून घेण्यास काही अडचण नव्हती.

**<u>मध्यांतराची वेळ झाल्याने पुढील उलटतपास तहकुब.</u>**

श्रवणोत्तर स्वीकृत

ठिकाण- इचलकरंजी
दिनांक- १५/११/२०२५.

(**डी.बी.साठे**)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्र. २,
इचलकरंजी.